# अट्टल मत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-२४ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. २४ फेब्रुवारी ते २ मार्च २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

# वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वराचे अर्जंट दर्शन घडवून आणणाऱ्यावर कारवाई झालीच पाहिजे -गावकरी व भाविकांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर (विशेष प्रतिनिधी)**

**देवाधिदेव महादेवाचे वेरूळ घृष्णेश्वर १२ वे ज्योर्तिलिंग आहे. येथे वर्षभर भाविकांची रिघ असते. वर्षभरात अनेक उत्सव येथे साजरे केले जातात. परंतु दुर्दैव असे आहे की, दलालांमार्फत मात्र भाविकांची प्रचंड प्रमाणात लूट केली जाते ती अयोग्य आहे. यापूर्वी 'अट्टल मत'ने दलालांकडून होत असलेल्या लुटीवर सर्वप्रथम आवाज उठवला. तसेच पोलिस अधिकाऱ्यांशी ब ोलणे केले होते. परंतु यात कोणाचा 'आर्थिक' फायदा आहे हे मात्र न कळण्यापलिकडचे आहे. देवाला तरी सोडले पाहिजे. नुसतेच डिवल्याब ावल्या करणाऱ्यांकडून भाविकांची होत असलेली लूट थांबवली पाहिजे. डायरेक्ट दर्शनाच्या नावाने लूट याचा पर्दाफाश 'अट्टल मत' ने निस्वार्थ पद्धतीने केला आहे.**

**२०२३ मध्ये श्रावण महिन्यात जेव्हा आम्ही वृत्त प्रसिद्ध केले होते. तेव्हा आम्हाला दलालांनी धमकावण्याचा प्रकार केला होता. परंतु त्यांना आम्ही पूरून उरलो होतो. ८ मार्च २०२४ रोजी महाशिवरात्रीला तरी या दलालांवर वचक मंदिर विश्वस्त समितीने तसेच पोलिस प्रशासनाने ठेवावा, अशी तोडकी अपेक्षा अट्टल मत व भाविकांकडून केली होती. आता २०२५ मध्ये यावर कोण किती खरे उतरते हे पाहण्यासारखे आहे.**

**प्रशासनाकडून टोलवाटोलवी केली जात असेल तर ते योग्य नाही कमीत कमी महादेवाच्या भक्तांशी तरी हा खेळ करू नये अशी प्रांजळ अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रसादाच्या नावाखालीही अव्वाच्या सव्वा दर लावून देशाभरातून येणाऱ्या भाविकांची लूट करू नये.**

## कडक बंदोबस्तात लाखो भाविक घृष्णेश्वर चरणी

### दलालांकडून चोरट्या पद्धतीने फसवणूक करीत भाविकांची लूट



## भाविकांच्या अपेक्षेवर तरी खरे उतरावे, नुसत्याच गप्पा मारू नये

महाशिवरात्रीनिमित्त वेरूळ नगरी सजली पाहिजे असे कोणाला वाटत नाही. कोणाला वाटो ना वाटो परंतु भाविकांना तर मात्र वाटतेच परंतु यात सर्वांचा सहभाग हा महत्त्वाचा असतो. नुसतेच कागद काळे करून व वेळ मारून नेण्यात काही अर्थ नाही. महाशिवरात्री यात्रेत भाविकांची किती काळजी घेतली आहे हे २६ फेब्रुवारीलाच कळेल. परिसरात किती स्वच्छता होती, किती लूटमार होती. नुसत्या एसी रूममध्ये बसून गप्पा मारण्यात काय 'अर्थ' नाही.

यात्रेच्या निमित्ताने यात्रेच्या पार्श्वभूमीवर वेरूळ बारावे ज्योतिर्लिंग श्री. घृष्णेश्वर मंदिर परिसरात आढावा बैठक संपन्न झाली. खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील महाशिवरात्रीच्या निमित्ताने श्री घृष्णेश्वर मंदिर परिसरात उपविभागिय अधिकारी संतोष गोरड यांच्या अध्यक्षतेखाली महाशिवरात्रीच्या निमित बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीचे अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड व उपविभागीय पोलीस अधिकारी विजय कुमार ठाकुरवाड. यांचे अध्यक्षतेखाली पार पडली.

## महाशिवरात्रीनिमित्त त्र्यंबकेश्वर मंदिरात व्हीआयपी दर्शन बंद!

**नाशिक :** महाशिवरात्री अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. यानिमित्त अनेक शिवभक्त महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भगवान शंकराच्या मंदिरात जातात. यातच बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असणारे नाशिकमधील त्र्यंबकेश्वर मंदिरात (ढीळालरज्ञशीहुरी ढशाश्रिश) म हाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळते. दरवर्षी होणारी भाविकांची गर्दी पाहता मंदिर प्रशासनाने निर्णय घेतला आहे.

महाशिवरात्रीला त्र्यंबकेश्वराच्या दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेता देवस्थान ट्रस्टने, त्र्यंबकेश्वर मंदिर २ दिवस चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बुधवारी पहाटे ४ वाजल्यापासून ते गुरुवारी रात्री ९ वाजेपर्यंत मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुलं राहणार आहे. या काळात व्हीआयपी दर्शन आणि गर्भगृह दर्शन देखील बंद ठेवण्यात येणार आहे. तर २६ तारखेला महाशिवरात्रीच्या दिवशी देणगी दर्शन (पेड दर्शन) देखील बंद राहणार आहे.

**महाशिवरात्रीनिमित्त ट्रस्टची जय्यत तयारी** - महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टतर्फे मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येत आहे. मंदिराचे गर्भगृह, सभामंडप, प्रवेशद्वार उत्तर आणि पूर्व महाद्वार इत्यादी ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येणार आहे. महाशिवरात्री उत्सवानिमित्त ट्रस्टतर्फे त्तीन दिवस सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सोमवारी (२४ फेब्रुवारी) मेहंदी तसेच मंगळवारी (२५ फेब्रुवारी) हळदीचा समारंभ होणार आहे. सायंकाळी बासरी वादन कार्यक्रम होणार आहे. बुधवारी (२६ फेब्रुवारी) दुपारी श्री त्र्यंबकराजांची पालखी मंदिरातून निघेल. पारंपरिक मार्गानुसार तिर्थराज कुशावर्त येथे षोडशोपचार पुजा करुन संध्याकाळी पालखी पारंपरिक मार्गाने पुन्हा देवस्थानमध्ये येणार आहे. पालखी दरम्यान शिव तांडव ग्रुपतर्फे अघोर नृत्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे. सायंकाळी नटरंग अकॅडमी पुणे प्रस्तुत शिवार्पणमस्तू नृत्य कार्यक्रमाची प्रस्तुती अभिनेत्री प्राजक्ता माळी व सहकलाकार सादर करणार आहेत. ट्रस्टतर्फे बुधवारी (२६ फेब्रुवारी) त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगावर लघुरुद्र अभिषेक सायंकाळी करण्यात येणार आहे. विशेष महापूजा व पालखी सोहळा रात्री होणार आहे, अशी माहिती देवस्थान ट्रस्टने दिली आहे.

# वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वराचे अर्जंट दर्शन घडवून आणणाऱ्यावर होणार कारवाई -उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड



खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिर येथे उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या अध्यक्षतेखाली महाशिवरात्री यात्रा म होत्सव निमित्त घृष्णेश्वर मंदिर परिसरात आढावा बैठक आज दि. १७ रोजी घेण्यात आली.या बैठकीत विविध विभागा अधिकारी यांच्या उपस्थितीत.पुरातत्व विभाग, श्री घृष्णेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्ट, महावितरण,अन्न व औषध प्रशासन, महसूल प्रशासन, पंचायत समिती, ग्रामपंचायत वेरूळ, सार्वजनिक बांधकाम विभाग. आरोग्य विभाग, विविध वस्तू विक्रेते प्रतिनिधी, व्यावसायिक यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच वेरूळ ग्रामस्थांच्या उपस्थितीत सदरील आढावा बैठक घेण्यात आली.

यावेळी मंदिर व यात्रा परिसरात सीसीटीव्ही,केमेरा पोलीस बंदोबस्त, आरपीएफ चे पथक,भाविकांना येण्यासाठी बसेस पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि शौचालय याशिवाय आपत्कालीन परिस्थितीसाठी वैद्यकीय पथक व अम्बुलन्स याची उपलब्धतेसाठी संबंधित विभाग आणि कार्यालय प्रमुखांना सूचना देण्यात आल्या.तसेच वेरूळ ग्रामस्थांसाठी पहाटे चार ते सकाळी आठ वाजेपर्यंत आधार कार्ड घेऊन दर्शन उपलब्ध राहणार आहे. (अर्जंट दर्शन घडवून आणणाऱ्या वर होणार कार्यवाही या बैठकीमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड यांनी घृष्णेश्वर मंदिर येथे अर्जंट दर्शनाच्या नावाखाली भाविकाची लूट करत असलेले मंदिर कर्मचारी,काही दलाल यांच्यावर महाशिवरात्र तसेच येणाऱ्या काळात पोलीस प्रशासनाची करडी नजर राहणार असून पोलिस प्रशासनाचे कर्मचारी सध्या कपड्यांवर. साधे व शाखात गस्त घालणार आहेत. जर कोणी अर्जंट दर्शनाच्या नावाखाली भाविकांकडून पैसे उकळत असल्याचे आढळल्यास व त्यात स्थानिक कर्मचारी देखील आढळल्यास कारवाई करण्यास पोलीस प्रशासन कुठलीही हयगय करणार नसून कायदेशीर कार्यवाही करणार असल्याचे उपविभागीय अधिकारी ठाकूरवाड यांनी सदरील आढावा बैठकीत सूचना दिली. बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची हेळसांड होतीये, अर्जंट दर्शनाच्या नावाखाली मंदिर परिसरात एजंट लुटत असल्याचा आरोप अनेक भाविकांनी देवस्थानाच्या विश्वास्त मंडळांनीही वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे कडे तक्रार केली होती. वेरूळ येथील बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर महादेव मंदिरात सध्या एजंटकडून. अर्जंट दर्शनाचा काळाबाजार सुरू असल्याचा आरोप काही भाविकांनी केला आहे. प्रचंड गर्दी असल्यामुळे काही लोक या गर्दीतून वेळ वाचवण्यासाठी तत्काळ देवदर्शन मिळावं अशी अनेक भाविकांची इच्छा असते. मात्र,भोळ्या भाविकांची हिच अति घाई हेरून मंदीर परिसरात एजंट्सचा सुळसुळाट झाली आहे. जलद दर्शन घडवून देतो, असं सांगत एजंट भाविकांकडून हजारो रूपये लुटतात. असं येथे महादेवाच्या दर्शन घेण्यासाठी आलेल्या शेकडो भाविकांनी पत्रकारांशी बोलताना अनेक वेळी सांगितले. मात्र आज महाशिवरात्रीच्या महा उत्सवा निमित्ताने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी बैठकीत बोलताना सांगितले की अर्जंट दर्शनाच्या नावाखाली भाविकाची लूट करणाऱ्या दलालावर कारवाई करून गुन्हा दाखल करण्याचे सूचना या बैठकीत दिले .यावेळी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड, तहसीलदार स्वरूप कंकाळ, पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिर संस्थानाचे नवनिर्वाचित अध्यक्ष योगेश टोपरे, विश्वस्त संजय वैद्य, कुणाल दांडगे.म ाजी. उपसभापती विजय भालराव. दीपक अग्निहोत्री (दत्ता गुरु) राजेंद्र कोशिंके. उपसरपंच विजय राठोड,माजी सरपंच प्रकाश पाटील, साहेबराव पांडव,रेखा सुरेश ठाकरे. आकाश ठाकरे.मिलिंद बाळू शेवाळे.विश्वास्त. सामाजिक कार्यकर्ते सतीश लोखंडे,रमेश माळी, अनिल आव्हाड, शेख शोएब. ग्रामसेवक चंद्रकांत इंगोले. पोलीस पाटील रमेश ढिवरे. ज्ञानेश्वर भालेराव.यांच्यासह पदाधिकारी ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## प.पू.गाडगेबाबा : एक थोर समाज सुधारक!

गाडगे महाराजांचा जन्म दि.२३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील ता.दर्यापूर, शेंडगाव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. ते त्यांच्या आईच्या माहेरी-मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे त्यांच्या मामाकडेच त्यांचे बालपण गेले. त्यांच्या मामाची बरीच मोठी शेतजमीन होती. लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता, विशेषतः गुरांची निगराणी करायला त्यांना फार आवडे. त्यांचे वडील झिंगराजी हे परीट होते. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते. डेबूजी लहान असतांनाच त्यांचे वडील दारूच्या व्यसनापायी मृत्युमुखी पडले. त्यामुळे घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने लहानपणापासूनच गुरे राखणे, नांगर चालविणे, शेतीवाडी करणे अशी कामे ते करत असत. त्यांना कामाची खूप आवड होती. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण होता. डेबूजींचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांना चार मुली होत्या. पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे. सन १८९२ साली त्यांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारश्याच्या दिवशी त्यांनी रूढीप्रमाणे दारु व मटणाच्या जेवणाऐवजी गोडाधोडाचे जेवण दिले होते. हा त्या काळातील परंपरेला दिलेला छेद होता, दिलेली बगल होती. गावात कोणाचे काही अडले नडले, कोठेही काही काम करावयाचे असले की, गाडगे महाराज स्वतःहून पुढे येत. सार्वजनिक हिताची कामे सर्व जनांनी एकवटून केली पाहिजेत, हा धडा त्यांनी मिटल्या तोंडी गावकऱ्यांना शिकविला. दिनांक १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडलेला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपल्या वाटेने निघून जायचे हा त्यांचा खाक्या असायचा. ते सतत एक खराटा जवळ बाळगायचे. अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असे. त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका, असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे; हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. 'मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही' असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा- प्रामुख्याने वऱ्हाडी बोलीचा उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. देवभोळ्या माणसापासून ते शहरी नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे, असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते. संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश- गाडगेबाबा प्रबोधन काव्य- 'भुकेलेल्यांना = अन्न, तहानलेल्यांना = पाणी, उघड्यानागड्यांना = वस्त्र, गोरगरीब मुलामुलींना = शिक्षण, शिक्षणासाठी मदत, बेघरांना = आसरा, अंध, पंगू, रोगी यांना = औषधोपचार, बेकार-बेरोजगारांना = रोजगार, पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना = अभय, गरीब तरुण-तरुणींचे = लग्न, दुःखी व निराशांना = हिंमत' हा मानवधर्म पाया आहे. त्यांनी नाशिक, देहू, आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, गोरगरीब जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालये बांधली, अनेक नद्यांकाठी घाट बांधले, अतिशय गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांची सेवा केली.

# बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर

**घृष्णेश्वर** मंदिर हे एक प्राचीन शंकराचे मंदिर आहे. वेरूळपासून अवघ्या दीड किलोमीटरवर असलेले घृष्णेश्वर हे शंकर मंदिर भारतातील महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. तसेच बारा ज्योतिर्लिंगातील हे शेवटचे ज्योतिर्लिंग आहे. शिवपुराण, स्कंदपुराण, रामायण, महाभारत या ग्रंथांत या मंदिराचे उल्लेख दिसून येतात.

वेरूळ गावातील येलगंगा नदीजवळ हे मंदिर असून छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचे आजोबा आणि शहाजीराजे भोसले यांचे वडील मालोजीराजे भोसले यांनी या मंदिराचा १६ व्या शतकात पहिल्यांदा जीर्णोद्धार केला होता.

सध्याचे अस्तित्वात असलेले मंदिर इ.स. १७३० मध्ये मल्हारराव होळकरांच्या पत्नी गौतमीबाईंनी बांधलेले असून नंतर शिवभक्त अहिल्याबाई होळकरांनी या मंदिराचा परत एकदा जीर्णोद्धार केला.

या मंदिराचे बांधकाम लाल रंगाच्या दगडामध्ये करण्यात आले आहे. या मंदिराचे नक्षीकाम अवर्णनीय आहे. या मंदिराला २७ सप्टेंबर १९६० रोजी राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले.

**घृष्णेश्वर मंदिराची वास्तुकला..**

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात पारंपारिक दक्षिण भारतीय वास्तू पाहता येते. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर परिसरात अंतर्गत कक्ष



आणि गर्भगृह आहे. या मंदिराचे बांधकाम, ४४०० चौरस फ़ूट क्षेत्रावर पसरलेले आहे. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगमंदिर परिसरामध्ये पाच-स्तरीय उंच शिखर आणि अनेक खांब आहेत, जे पौराणिक गुंतागुंतीच्या कोरीव कामाच्या स्वरूपात बांधलेले आहेत.

मंदिराच्या आवारात बांधलेल्या लाल दगडी भिंती मुख्यतः भगवान शिव आणि भगवान विष्णू यांचे दहा अवतार दर्शवितात. गर्भगृहात पूर्वेकडे शिवलिंग असून तेथे नंदीस्वरची मूर्तीही दिसते. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाची कहाणी पती-पत्नी जोडप्या सुधर्मा आणि सुधा यांच्या कथेपासून सुरू होते. दोघेही त्यांच्या वैवाहिक जीवनात आनंदी होते, परंतु ते बालसुखापासून वंचित होते आणि हे सिद्ध झाले की सुदेहा कधीही आई होऊ शकत नाही. म्हणून सुदेहाने तिचा पती सुधर्मा हिची धाकटी बहीण घुश्मासोबत लग्न केले. वेळ गेला आणि घुश्माच्या गर्भिछतेपासून, एक सुंदर मुलाचा जन्म झाला. पण हळू हळू तिच्या हातातून तिचा पती, प्रेम, घर आणि आदर जात असल्याचे पाहून सुधाच्या मनात ईर्षेची बीजं फ़ुटू लागली आणि एके दिवशी संधी पाहून तिने मुलाची हत्या केली आणि त्याच तळ्यामध्ये त्याचे शरीर त्या तलावात दफ़्न केले ज्यात घुश्मा शिवलिंगाचे विसर्जन करत होती. सुधर्माची दुसरी पत्नी घुश्मा, जी भगवान शिवची भक्त होती, ती दररोज सकाळी उठून १०१ शिवलिंगे बनवून पूजन करायची आणि नंतर तलावामध्ये विसर्जित करत असे. मुलाची बातमी ऐकून चहूबाजूंनी आक्रोश झाला, पण दररोज प्रमाणेच, घुश्माही शिवलिंग बनवून शांत मनाने भगवान शिवाची पूजा करत राहिली आणि जेव्हा ती तलावात शिवलिंगाचे विसर्जनकरायला गेली, तेव्हा तिचा मुलगा जिवंत बाहेर आला आला. त्याच वेळी भगवान शिव सुद्धा घुश्माला दिसले, भोलेनाथ सुधाच्या या कृतीवर रागावले आणि तिला शिक्षा आणि घुश्माला वरदान देऊ इच्छित होते. पण घुश्माने सुधेला क्षमा करावी अशी विनवणी केली आणि भगवान शंकराला लोकांच्या कल्याणासाठी येथे राहण्याची प्रार्थना केली. घुश्मची विनंती मान्य करून भोलेनाथ शिवलिंगाच्या रूपाने येथेच राहू लागले आणि हे स्थान जगभरात घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग म्हणून प्रसिद्ध झाले. घृष्णेश्वर मंदिराजवळ एक तलाव आहे.ज्याचं नाव शिवालय तलाव असे आहे.भाविक लोक घृष्णेश्वर मंदिरासोबत या तलावाला देखील मोठ्या भक्ती भावाने भेट देतात.

# कैलास मंदिराची निर्मिती अतिशय नियोजनबद्ध

वेरूळचं कैलास लेणं हे संपूर्ण जगाला पडलेलं कोडं आहे. एकसंध खडकातून कोरण्यात आलेलं हे लेणं इ. स. ७५७ मध्ये राष्ट्रकूट राजवंश नरेश कृष्ण (प्रथम) यांच्या राजवटीत कोरण्यात आलं.

युनेस्कोच्या भारताच्या जागतिक वारसास्थळाच्या यादीत वेरूळचं नाव हे पहिल्या पाच स्थळांमध्ये येतं. या मंदिराची निर्मिती ही 'आधी कळस मग पाया', या तत्त्वावर केली गेली आहे. भारतातील सगळ्या लेणी या एकतर खालून वर, नाही तर डोंगरफ़ोडून समोरून आत अशा कोरलेल्या आहेत. मात्र कैलास मंदिराची निर्मिती अतिशय नियोजनबद्धपणे कळसापासून पायापर्यंत करण्यात आली आहे.

कैलास लेणं – हे मंदिर बनवण्यासाठी साधारण १५० वर्षं लागली असावी असं संशोधकांना वाटतं. हिमालयातील पांढऱ्या शुभ्र बर्फ़ामध्ये कैलास पर्वतावर महादेवाचे वास्तव्य आहे, असं हिंदू पुराणांमध्ये म्हटलंय. त्यानुसार हे मंदिर जेव्हा पूर्ण झालं तेव्हा त्याला पांढऱ्या रंगाचा लेप लावण्यात आला होता. मात्र आता हा लेप काळाच्या ओघात निघून गेला आहे. तरीही काही ठिकाणी आपल्याला याचे अंश बघायला मिळतात. इतिहास संशोधक डॉ. दुलारी कुरेशी सांगतात, 'कैलास मंदिर निर्माण करताना



एका मोठ्या शिळेला तीन भागांमध्ये वरून खालपर्यंत खोदण्यात आलं. या खोदकामात जवळपास २० हजार टन दगड फ़ोडून वेगळा करण्यात आला. लेणीच्या मध्यभागी जे मुख्य मंदिर आहे त्यामध्ये वरच्या बाजूला एक मोठे शिवलिंग आहे.

'या शिवलिंगाच्या समोर मोठा महामंडप आहे. या महामंडपात अनेक मोठमोठे, सुंदर कोरीवकाम असलेले स्तंभ आहेत. तर मंदिराच्या छताच्या आतल्या बाजूस भगवान शिवाचं तांडव नृत्य करणारं शिल्प कोरण्यात आलं आहे.

**कैलास लेणं** – तसंच मंदिराच्या शिखरावर पाच सिंह कोरण्यात आले आहेत. आपण महाबलीपुरम येथे पाहिलं तर तिथेही सिंह, हत्ती कोरलेले आहेत. मात्र इथे कैलास मंदिरात या हे प्राणी पूर्णाकृती रूपात पाहायला मिळतात. या संपूर्ण मंदिराची बांधणी एखाद्या रथाप्रमाणे असून हे मंदिर व्याळ आणि हत्ती यांसाख्या प्राण्यांनी डोक्यावर उचललेलं आहे.

हे मंदिर म्हणजे दक्षिण आणि उत्तर वास्तु स्थापत्यशैलीचा उत्कृष्ट नमुना आहे. इथे समोरच्या बाजूला पाहीलं तर तुम्हाला गोपुरं दिसतात, तर पाठीमागच्या बाजूला शिखर दिसतात. तसंच या मंदिराच्या समोरील दोन्ही बाजूस दोन हत्ती आणि दोन ध्वजस्तंभ कोरलेले आहेत.'

**२० हजार टन दगडांचं काय केलं? –** डोंगर फ़ोडून जेव्हा कैलास मंदिर बनवण्यात आलं, तेव्हा जवळपास २० हजार टन खडक फ़ोडून बाहेर काढण्यात आला. पण कैलास मंदिराच्या आसपासच्या परिसरात कुठेही या दगडाचे अंश दिसत नाहीत. त्यामुळे एवढ्या मोठ्या खडकांचं नेमकं काय झालं, याबद्दल माहिती देताना डॉ. कुरेशी सांगतात की, 'आपण पाहिलं तर कैलास मंदिराच्या जवळपास अनेक मंदिरं आहेत. तसंच मराठवाड्यातही अनेक मंदिरं आहेत, जी चालुक्य आणि राष्ट्रकूट काळात बांधण्यात आलेली आहेत. या मंदिरांचे बांधकाम कैलास मंदिर ज्या खडकामध्ये आहे त्याच खडकांत आहेत. मात्र त्या मंदिरांच्या जवळपास कुठेही उत्खनन केलेलं नाही अथवा डोंगरही नाहीत. त्यामुळे कैलास मंदिराच्या निर्मितीमधून निघालेला खडक या मंदिराच्या निर्माणात वापरला असावा अशी शक्यता आहे.

**कैलास मंदिराखाली एक पुरातन शहर आहे का? –** कैलास मंदिराबाबत अनेक गोष्टी बोलल्या जातात. मंदिराच्या चारही बाजूस गुहेप्रमाणे काही जागा आहेत. ज्या अतिशय खोलवर गेलेल्या आहेत. काही परदेशी संशोधकांच्या मते या मंदिराच्या जमीनीखाली एक पुरातन शहर असण्याची शक्यता आहे. तर काही संशोधक हे मंदिर परग्रहवासीयांनी उभारल्याचं सांगतात. पावसाचं पाणी परिसरात थांबू नये म्हणून ड्रेनेज सिस्टिम बनवण्यात आलेली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६५ वा दीक्षांत समारंभ

# भारत विकासाच्या अमर्याद संधींचा देश- उपराष्ट्रपती धनखड

# प्राप्त ज्ञानाचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी व्हावा -राज्यपाल

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

वेगाने विकास होत असलेला आपला भारत देश विकासाच्या अमर्याद संधी असलेला देश आहे. या संधी युवक युवतींनी ओळखाव्या व आपल्या व देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे,असे आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केले.

भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या प्रमुख उपस्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६५ वा दीक्षांत समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाला उपराष्ट्रपतींच्या सुविद्य पत्नी डॉ. श्रीमती सुदेश धनखड, राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन, खासदार डॉ. भागवत कराड, कुलगुरू डॉ. विजय फुलारी उपस्थित होते.

श्री. धनखड म्हणाले की, गेल्या दशकात देशाने तंत्रज्ञान क्षेत्रात आणि आर्थिक क्षेत्रात प्रगती केली आहे. आपण जगातील पाचवी अर्थव्यवस्था झालो असून तिसरी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहोत. देशात प्रचंड क्षमता असून आता आपण विकासाच्या मार्गावर वेगाने पुढे जात आहोत. पायाभूत सुविधा, दळणवळण, इंटरनेट सुविधा, तंत्रज्ञानाचा उपयोग विविध क्षेत्रात करुन आपण पुढे जात आहोत. जगाच्या एकूण व्यवहारापैकी १५ टक्के आर्थिक व्यवहार आपल्या देशात होत आहेत. आपल्या देशात उपलब्ध असलेल्या विकासाच्या संधी जोपर्यंत देशातील युवकांना लक्षात येत नाही तोपर्यंत वेगाने पुढे जाता येत नाही. युवकांसमोर अमर्याद संधी आहेत. ग्रामीण भागातून, लहान शहरातून स्टार्ट अप पुढे येत आहेत. सागरी तंत्रज्ञान ते अंतरीक्ष तंत्रज्ञानापर्यंत विविध क्षेत्रात संधी आहेत. विकसित भारत हे आपले स्वप्न असून त्या दिशेने आपली वाटचाल सुरू आहे. नव्या संधींचा उपयोग करीत देशाच्या विकासाचे नेतृत्व युवकांनी स्वीकारणे आवश्यक आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्यापीठाला असलेले नाव आणि छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव शहराला असल्याने इथे भेट देणे विशेष असल्याचे नमूद करून उपराष्ट्रपती श्री.धनखड म्हणाले,वैयक्तिक प्रयत्न, पालक आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाने स्नातकांना यश मिळाले आहे. दीक्षांत समारंभ म्हणजे शिक्षणाचा अंत नव्हे. शिक्षण हे आयुष्यभर सुरुच राहणार आहे, हे लक्षात ठेवून जीवनात सातत्याने ज्ञान प्राप्त करायचा प्रयत्न करावा. विद्यापीठाचे विद्यार्थी म्हणून विद्यापीठाच्या विकासात योगदान द्यावे. या महान विद्यापीठाच्या उत्कर्षासाठी प्रत्येक माजी विद्यार्थ्याने या प्रक्रियेत आपले योगदान देणे गरजेचे आहे.

**राष्ट्रप्रथम हाच प्रगतीचा विचार**

राष्ट्र प्रथम हा विचार करून दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी आपल्याला वेगाने आणि निश्चयाने पुढे जावे लागेल. सामाजिक सहचर्य, विविधतेत एकता, सांस्कृतिक मूल्यांची जपणूक, ज्येष्ठांचा सन्मान, पर्यावरण रक्षण या मुल्यांचा अंगिकार करुन आपण प्रगती करु शकतो. स्वदेशी, भारतीयत्वाचा अभिमान आणि समर्पित भावनेद्वारे देशाला सर्वोच्च स्थानावर पोहोचविता येईल. देश विरोधातील शक्तींना बाजूला सारून हे साध्य करता येईल, यासाठी युवकांना पुढाकार घ्यावा लागेल.

देशाला अस्थिर करणाऱ्या बाबींपासून आपल्याला सजग राहावे लागेल. भारतात प्रगतीच्या अनेक संधी असल्याने जगाचे लक्ष आपल्याकडे आहे. विद्यापीठाने या संधी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्यात जेणेकरून त्यांच्या प्रयत्नांना पंख फुटतील आणि ते यश संपादन करू शकतील. प्रत्येक युवक-युवतीने आपल्या क्षमता ओळखून या संधींचा उपयोग करून यशस्वी व्हावे. आपल्या पालकांना आनंदाचे क्षण द्यावे. जीवनातील अपयश तात्पुरते असते, आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नाने त्यावर मात करता येईल, अशा शब्दात उपराष्ट्रपत धनखड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**प्राप्त ज्ञानाचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी करा- राज्यपाल राधाकृष्णन**

राज्यपाल तथा कुलपती राधाकृष्णन यांनी स्नातकांना दीक्षांत संदेश दिला. ते म्हणाले की, जीवनातील विविध क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आज तुम्हाला पदवी प्रदान करण्यात येत आहे. आपल्या शिक्षणाचा आणि त्यातून प्राप्त ज्ञानाचा देशाच्या विकासासाठी, समाजाच्या भल्यासाठी उपयोग करावा. आपले आईवडील, गुरुजन यांना अभिमान वाटेल असे कर्तृत्व सिद्ध करा. सत्याधारीत कृती करतांना जीवनात चांगल्या गोष्टींचे अनुसरण करावे, असे त्यांनी सांगितले. कुलगुरू डॉ.फुलारी यांनी प्रास्ताविक करताना उपस्थितांचे स्वागत केले.

**पीएम उषा मेरु योजनेअंतर्गत चार इमारतींचे भूमिपूजन**

उपराष्ट्रपती महोदयांच्या हस्ते पी.एम. उषा मेरु योजने अंतर्गत मंजूर चार इमारतींचे दृकश्राव्य पद्धतीने भूमिपूजन करण्यात आले. या योजनेअंतर्गत विद्यापीठाला १०० कोटींचे अनुदान मंजूर झाले आहे. यामध्ये 'स्ट्रेस बस्टर रिक्रेशन फॅसिलीटी सेंटर' (९ कोटी ४८ लाख), सेंटर फॉर फोक ॲकण्ड कल्चरल स्टडीज ऑफ मराठवाडा (६ कोटी ६२ लाख), स्टूडंटसब फॅसिलीट इन लायब्ररी ॲअण्ड रिडींग रुम (३ कोटी ७५ लाख) तसेच सेंटर फॉर डिजीटल ट्रासफॉर्मेशन (७ कोटी ७४ लाख) अशा चार इमारतीचा समावेश आहे.

**'एक पेड माँ के नाम' अंतर्गत वृक्षारोपण** – या कार्यक्रमापूर्वी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, कुलपती सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते नाट्यगृह परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी आंबा, चिकु व जांभुळची रोपे लावण्यात आली.

**५६ हजार १२२ पदवीधारक**

दीक्षांत समारंभात ऑक्टोबर- नोव्हेंबर २०२३ व मार्च-एप्रिल २०२४ या परीक्षेत उत्तीर्ण पदवीधारकांना पदव्यांचे वितरण करण्यात आले. या दोन्ही परीक्षेत पदविका, पदवी, पदव्यूत्तर पदवी प्राप्त विद्यार्थी तसेच १४ जून २०२४ ते ८ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान पीएच.डी प्राप्त करणा-या एकशे सहा संशोधकांनी पदव्यांचे वितरण करण्यात आले.यंदाच्या दीक्षांत सोहळयास पदवी प्राप्त करण्यासाठी एकुण ५६,१२२ विद्यार्थ्यांनी आवेदन पत्र दाखल केले. यामध्ये पदवीधर ४२ हजार ६६६, पदव्यूत्तर पदवी १३ हजार १८७, एम.फिल धारक १६ व पीएच.डी. धारक १०६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ.वाल्मिक सरवदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ.भारती गवळी, डॉ.कुलसचिव प्रशांत अमृतकर, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्राध्यापक, स्नातक उपस्थित होते.


# श्री १००८ कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाल दिगंबर जैन मंदिर सिडको येथे वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन

## आचार्य विद्यासागरजी महाराज यांच्या प्रथम समाधी दिवस निमित्य चरण पादुका स्थापना

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री १००८ कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाल दिगंबर जैन मंदिर एम-२ सिडको येथे रविवार दिनांक २३ फेब्रुवारी रोजी वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे व आचार्य १०८ विद्यासागरजी महाराजांच्या प्रथम समाधी महोत्सवा निमित्य चरण कमल पादुकेची स्थापना करण्यात येणार आहे ही चरण पादुका प.पू १०८ आगमसागरजी महाराज





व नगर गौरव प.पू.१०८ पुनित सागरजी महाराज यांच्या मार्गदर्शनाने व प्रेरणेने स्थापना होत आहे. यात्रा महोत्सवासाठी प.पू १०८ आचार्य पवित्रसागरजी महाराज, मुनि प्रशांत सागरजी महाराज, मुनिश्री प्रभावसागरजी महाराज, मुनिश्री प्रभातसागरजी महाराज, ब्र.अनिल घेवारे, ब्र.ज्ञानेश्वर उदगीरकर यांच्या आर्शिवादाने होत आहे.

सालाबादाप्रमाणे मराठवाडयाची राजधानी व संतांची पावनभुमी छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको भागातील प.पु.तिर्थरक्षा शिरोमणी १०८ आचार्य आर्यनंदी महाराजांच्या प्रेरणेतुन स्थापन झालेल्या मंदिरात वार्षिक यात्रा महोत्सव निमित्त दिनांक २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.१५ वाजता प्रमोद डेरे यांच्या हस्ते धर्मध्वजारोहन होणार आहे

तसेच ७.३० वाजता किर्ती स्तंभ पाशर्श्वनाथ चौक येथे नितीनजी चित्ते व ज्योतीताई पिंजरकर यांच्या हस्ते धर्मध्वजारोहन होऊन कार्यकमाची सुरुवात करण्यात येणार आहे. सकाळी ७.४० वाजता भव्य शोभायात्रा पाश्र्श्वनाथ चौक पासुन निघणार आहे. सकाळी १०.३० वाजता मंगलकलश स्थापना भगवंताचा पंचामृत अभिषेक होणार आहे. तसेच सकाळी ११ वाजता संगीतमय कल्याण विधान आणि ६४ रिद्धी विधान आयोजन करण्यात आले आहे वार्षिक यात्रा महोत्सवासाठी सौधर्म इंद्र - अनिल दिगंबर जी क्षिरसागर, ईशान इंद्र संजीवनी बाळशेटे सानदकुमार इंद्र - अर्चना अमोल मोगले, महेद इंद्र -- चंचल शंतनु डहाळे, कुबेर इंद्र, पल्लवी शेखर वायकोस हे लाभले आहे. तर प्रतिष्ठाचार्य म्हणुन राजेश रोकडे हे लाभले आहे. तर संगीतकार म्हणुन मनोज पाटील आळते कोल्हापुर हे असणार आहेत. यावेळी उपस्थित भाविकांना सकल दिगंबर जैन समाज यांच्या वतीने महाप्रसाद व अल्पोहार देण्यात येणार आहे.

तरी समाज बांधवांनी वरील कार्यकमास उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष दिगंबर क्षिरसागर, सचिव अमोल मोगले, उपाध्यक्ष विलास जोगी, सहसचिव निलेश सावळकर, कोषाध्यक्ष प्रकाश भाकरे, सहकोषाध्यक्ष वर्धमान वायकोस, सदस्य शेखर वायकोस, बाहुबली धोंगडे, संदीप वायकोस यांच्यासह प्रगती महिला मंडळाच्या अध्यक्षा सविता गोसावी, आर्यनंदी छात्रावासचे अध्यक्ष विलास जोगी तसेच कार्याध्यक्ष श्री दिगंबर वायकोस यांनी केले.

# देवगिरी महाविद्यालयात दृष्टिहीन १५० विद्यार्थ्यांना सिएसआर निधीमधून स्मार्ट व्हिजन चष्मा वितरण

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

देवगिरी महाविद्यालय येथे दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड, पूर्व मद्रास रोटरी क्लब, एसएससी टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड आणि हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन व देवगिरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्ट दृष्टी अंतर्गत कार्पोरेट सामाजिक बांधिलकी कार्यक्रमांतर्गत इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड च्या वतीने २४ लाख किंमतीचे अंध विद्यार्थ्यांसाठी मोफत १५० स्मार्ट व्हिजन चष्मा वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी म शिप्र मंडळ केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा.श्री. त्रिंबकराव पाथ्रीकर तर प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. श्री. विवेक जयस्वाल उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. संजीव रंजन वरिष्ठ व्यवस्थापक, इंडियन ऑइल कार्पोरेशन, श्री. इकबाल सिद्दिकी, उपव्यवस्थापक एलपीजी, श्री. मोहम्मद इब्राहिम एस एच जी टेक्नॉलॉजी, श्री.निवास राव पूर्व मद्रास रोटरी क्लब, श्री. धीरज कुमार वरिष्ठ व्यवस्थापक इंडियन ऑइल, श्री. विशाल लोडगे इंडियन ऑइल पेट्रोल पंप, श्री. दत्तात्रय कडवे समन्वयक हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रोफेसर अशोक तेजनकर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. सुदेश डोंगरे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी अंध विद्यार्थ्यांना महाविद्यालयात आतापर्यंत विविध सॉफ्टवेअर, ब्रेल टाईपराईटर, ध्वनिफिती अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्यात येते तसेच दृष्टिहीन विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येते याची माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर शहरातील तसेच जालना जिल्ह्यातील दृष्टिहीन विद्यार्थ्यांना पूर्व मद्रास



रोटरी क्लब यांच्या प्रयत्नातून इंडियन ऑइल कार्पोरेशन यांच्या सीएसआर फंडातून अंध विद्यार्थ्यांसाठी एस एच जी टेक्नॉलॉजी द्वारा निर्मित स्मार्ट व्हिजन चष्मा वितरित करण्यात आले. सदरील चष्मा हे उपकरण अंध विद्यार्थ्यांसाठी तिसरा डोळा आहे असे प्रतिपादन इंडियन ऑइल कार्पोरेशनचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री संजीव रंजन यांनी केले. हा चष्मा ए आय तंत्रज्ञानावर आधारित असून या चष्म्यामुळे दृष्टिहीन विद्यार्थ्यांना समोरील गोष्टींची इत्यंभूत माहिती होणार आहे या चष्मामुळे त्यांना त्या चष्मा मी त्यांना त्यांच्यासमोर असणाऱ्या प्रत्येक गोष्टीची वर्णनात्मक माहिती, दिशादर्शक फलक,तसेच अभ्यास, वाचन इत्यादी करता येणार आहे. या चष्म्यामध्ये १५ वेगवेगळे फीचर्स आहेत, वॉकिंग मोड, इमर्जन्सी मोड आदीमुळे दृष्टिहीन विद्यार्थी स्वतः स्वतःची मदत करू शकतात अशी माहिती एस एच जी टेक्नॉलॉजी उपाध्यक्ष मोहम्मद इब्राहिम यांनी दिली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना महाविद्यालयाद्वारे विविध सोयी सवलती सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामध्ये फिस माफी ग्रंथालयामध्ये विशेष कक्ष दिव्यांगासाठी सॉफ्टवेअर ह्या विषयी माहिती दिली. इत्यादी. सुवीधा देण्यात आल्या आहे. म. शि. प्र. मंडळ व्यवस्थापनाकडून अंध विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा देण्याची भूमिका गेल्या अनेक वर्षापासून असल्याचे प्राचार्यानी सांगितले त्यामुळे आज देवगिरी महाविद्यालयातील अनेक दृष्टीहीन विद्यार्थी वेगवेगळ्या आस्थापनामध्ये यशस्वीपणे सेवारत आहेत, उच्च शिक्षणामध्ये काही विद्यार्थ्यांनी पी.एचडी. सारखी सर्वोच्च पदवी संपादन केली आहे असे प्रतिपादन केले. श्री. इकबाल सिद्दिकी एलपीजी, उपव्यवस्थापक यांनी विद्यार्थ्यांना ए आय तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट व्हिजन चष्मा चा वापर विद्यार्थ्यांनी करावा या माध्यमातून अंध विद्यार्थी दुसऱ्यावर अवलंबून राहणार नाहीत असे मत व्यक्त केले. यात चोवीस लक्ष किमतीचे १५० पेक्षा अधिक चष्मे वितरण करण्यात आले त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील अंध विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. हेल्प द ब्लाईट या चेन्नई ही संस्था देवगिरी महाविद्यालयातील अंध मुलांना अद्यावत अत्याधुनिक सुविधा केंद्र पुढील काळात उभारणीसाठी मदत करणार असल्याचे समन्वयक दत्तात्रय कडवे यांनी सांगितले. कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये श्री. धीरज कुमार, श्री. गणेश खेत्री, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन श्री.विशाल लोडगे इंडियन ऑइल पेट्रोल पंप, श्री. दत्तात्रय कडवे, समन्वयक हेल्प ब्लाइंड फाउंडेशन श्री. मोहम्मद इब्राहिम आदींनी विद्यार्थी आणि पालक यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत अंध विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते, अनाम प्रेम स्वयंसेवी संस्थेचे श्री. जुगल किशोर मंत्री महाविद्यालयातील कर्मचारीदिव्यांग विद्यार्थी, पालक आणी शिक्षक आणि पालक त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. राजेश शेषम यांनी केले.

# उपराष्ट्रपती धनखड यांचे घृष्णेश्वराचे सपत्निक दर्शन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज वेरूळ येथील घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. त्यांच्या समवेत उपराष्ट्रपतींच्या सुविद्य पत्नी डॉ. श्रीमती सुदेश धनखड, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, खासदार डॉ. भागवत कराड होते. या वेळी मंदिर प्रशासनाने त्यांचे स्वागत केले.

त्यानंतर उपराष्ट्रपती धनखड यांनी विश्ववारसा स्थळ असलेल्या वेरुळ येथील लेणी क्र. १६ कैलास लेणेची पाहणी केली. त्यांनी येथील वारसास्थळ आणि लेणींविषयी माहिती जाणून घेतली. या परिसरातील कलाकृती ह्या अद्भूत असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

भारतीय पुरातत्त्व विभागाचे राजेश वाकलेकर यांनी उपराष्ट्रपती यांचे सपत्नीक स्वागत केले. दरम्यान वेरूळ सह परिसरात उपराष्ट्रपती येणार असल्याने मंदिर व लेणी परिसरात छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते. जागोजागी पोलीस बंदोबस्त, त्याचप्रमाणे बॉम्ब शोधक पथक, आरोग्य विभागाचे रुग्णवाहिका आणि मोठा ताफा त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आलेला होता. विशेष म्हणजे गेल्या अनेक महिन्यापासून मंदिर परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले होते. अनेक वेळी मंदिर देवस्थानाच्या वतीने गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांना या घाणीचे साम्राज्य संदर्भात सांगितले होते मात्र याकडे दुर्लक्ष केले होते विशेष म्हणजे शनिवारी उपराष्ट्रपतींच्या आगम नाच्या पार्श्वभूमीवर, श्री घृष्णेश्वर मंदिर परिसरातील अनेक महिन्यांपासून साचलेला कचरा अवघ्या २४ तासांत स्वच्छ केला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी गटविकास अधिकारी प्रकाश नाईक यांना परिसर स्वच्छ करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. त्या अनुषंगाने,वेरूळ ग्रामपंचायतीने तातडीने. जेसीपीच्या मदतीने परिसरात पसरलेले घाणीचे साम्राज्य सर्व काढण्यात आले परिसर स्वच्छ केला. प्रशासनाच्या या जलद कारवाईमुळे नागरिकांमध्ये सम धान व्यक्त होत आहे. उपराष्ट्रपतींच्या आगमनामुळे मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आल्याची चर्चा होत असली, तरी नियमित स्वच्छतेबाबत स्थानिक प्रशासनाने कायमस्वरूपी पावले उचलावीत अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# रिपब्लिकन क्रांती दल सामाजिक संघटनेच्या जिल्हा अध्यक्षपदी बाबासाहेब बोरुडे यांची फेरनिवड




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त रिपब्लिकन क्रांती दल सामाजिक संघटनेच्या वतीने राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे उपस्थित सर्व जिल्हा कार्यकारणी यांच्या सर्वांमध्ये रिपब्लिकन क्रांती दल सामाजिक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी बाबासाहेब शाहूराव बोरुडे यांची फेर निवड करण्यात आली.

मागील दोन वर्षाच्या काळामध्ये संघटनेच्या वाढीसाठी व जिल्ह्यातील तमाम गायरानधारकांसाठी महत्त्वपूर्ण भूमिका संघटनेच्या माध्यमातून बोरुडे यांनी घेतली आहेत.

विविध सामाजिक न्यायाचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केले आहे. त्यांना संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. अनिल गवळे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष भारत कोतकर, जिल्हा उपाध्यक्ष भूषण वाघ ,अमोल नवपुते, योगीराज पडवळकर, शहराध्यक्ष जितेंद्र खिल्लारे, शहर उपाध्यक्ष प्रवीण गवळे, जिल्हा संघटक दिनेश काळे, शहर संघटक गंगाधर कांबळे उपस्थित होते. बोरुडे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे

# राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती साजरी




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारतीय दलित पँथर या सामाजिक संघटनेच्या वतीने राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची १४९ वी जयंती आंबेडकर नगर येथे साजरी करण्यात आली. याप्रसंगी दलित पँथरचे अध्यक्ष लक्ष्मण दादा भुतकर महेंद्र सोनवणे यांनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकून स्वच्छतेचे महत्त्व गाडगे महाराज यांनी कसे दिले ते सविस्तरपणे आपल्या विचारातून व कृतीतून सांगितले व अंधश्रद्धा व शिक्षणाचे महत्त्व गाडगे महाराजांनी सम ाजाला अंगी करने कसे महत्त्वाचे आहे हे विचारातून मांडले.

या प्रसंगी दलीत पँथर चे प्रकाश पवार सतीश राऊत रामदास पगडे सिद्धार्थ गवई, दशरथ कांबळे, धर्मराज गवई, राजानंद नवतुरे, दिलीप पवार, संजय सरोदे, के एस जेष्ठ नागरिक कृती समिती महेंद्र सोनवणे, धम्मपाल दांडगे, पंडित साळवे, गौतम पगारे सह मोठे संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# महावितरणचे शाखा अभियंता काळबांडे यांची तात्काळ उचल बांगडी करा नसता शेतकऱ्यांचे आंदोलन

**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

तालुक्यातील बाजारसावंगी येथील महावितरणचे अभियंता मारुती काळबांडे यांची तत्काळ उचल बांगडी करून हेड ऑफिसला जमा करणे बाबत, अशी कारवाई न केल्यास,ज्यावेळी ही काळबांडे हे बाजार सावंगी येथील कार्यालयातील येतील, त्यावेळी त्याच ठिकाणी शेतकऱ्यांच्या वतीने त्यांना बांधून टाकण्यात येईल याची आपण गंभीरतेने दखल घ्यावी. यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी तुम्ही स्वतः तसेच कार्यालय व महावितरणचे संबंधित अधिकारी जबाबदार असतोल, महावितरणचे बाजार सावंगी ता. खुलताबाद येथील अभियंता मारुती काळबांडे यांच्या बाबतीत शेतकऱ्यांकडून अनेक तक्रारी असून, खुलताबाद तालुक्यातील पाडळी येथील शिवाजी जाधव रोहित्र दिनांक १० फेब्रुवारी रोजी जळालेले आहे. सदरील रोहित्र जळाले बाबत स्वानिक वायरमन श्री उंबरे यांनी ११ फेब्रुवारी रोजी शाखा अभियंता काळबांडे यांना कळविले परंतु शाखा अभियंता काळबांडे यांनी सदरील रोहित्र जळाल्याचा रिपोर्ट कार्यकारी अभियंता छत्रपती संभाजी नगर ग्रामीण २ यांच्या कार्यालयाला २० फेब्रुवारी रोजी पाठवला, म्हणजे तब्बाल ११ दिवसानंतर हा रिपोर्ट त्यांनी पाठवला.

सध्या रब्बी हंगामात पिकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे शेतकरी रोज जळालेले रोहित्र दुरुस्त करून मि ळण्या साठी पाठपुरावा करीत आहेत.परंतु काळबांडे यांच्या हलगर्जीपणामुळे शेतक-यांची पिके पाण्या अभावी जळून जात आहे.या बाबतीत शेतकऱ्यांच्या तक्रारी नंतर काळबांडे यांना जाब विचारला असता त्यांची उडवाउडुची उत्तरे व मस्तवाल पणा दिसून आला. शेतकऱ्यांना रोहित्र उपलब्ध करून देण्या ऐवजी शेतकऱ्यांशी अरेरावी करणे, उद्धटपणाने वागणे हे काळबांडे यांचे उद्योग आहेत. वारंवार तक्रारी करून देखील आपले कार्यालय काळबांडे यांच्यावर कोणतीच कारवाई करीत नसल्याचे दिसून येत आहे.मागील सोमवार पासून काळबांडे आपल्या कार्यालयात उपस्थित नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. अभियंता काळबांडे यांच्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे तसेच त्यांचे अरेरावी, शेतकऱ्यांशी उद्धटपणा वाढतच चालला असताना देखील अनेक तक्रारी येऊनही आपण कोणतीही कारवाई करीत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. सदरील निवेदनाद्वारे आपणास सूचना करण्यात येते की, काळबांडे यांची तत्काळ उचल बांगडी करून त्यांना हेड ऑफिसला जमा करून न घेतल्यास, ज्यावेळी ही काळबांडे हे बाजार सावंगी येथील कार्यालयातील येतील, त्यावेळी त्याच ठिकाणी शेतकऱ्यांच्या वतीने त्यांना बांधून टाकण्यात येईल याची आपण गंभीर दखल घ्यावी. यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी तुम्ही स्वतः तसेच कार्यालय व महावितरणचे संबंधित अधिकारी जबाबदार असतील. यावेळी निवेदन देताना भाजपा तालुकाध्यक्ष रविंद्र चव्हाण, ज्ञानेश्वर नलावडे प्रकाश वाकळे परसराम बारगळ योगेश बारगळ अरुण आघाडे सतीश दांडेकर शिवाजी गायकवाड अविनाश कुलकर्णी आशिष कुलकर्णी ज्ञानेश्वर बारगळ. यावेळी यांचे सह उपस्थिती होती.

# दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त संचालक माहिती कार्यालयात अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठी वृत्तपत्राचे जनक, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज संचालक माहिती कार्यालयात सहायक अधीक्षक प्रविण भानेगावकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

प्रदर्शन सहायक राजेंद्र वाणी, कार्यालयातील कर्मचारी दशरथ वानोळे, इंदुबाई गावंडे, पांडुरंग जाधव, शेख अब्दुल रहेमान, अनिल बिरोटे, अशोक सुरडकर, गणेश सुरासे यांनीही बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून यावेळी अभिवादन केले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.